
# हे वाचलं का?

रसिक वाचक मित्रहो !
सातत्याने बाजारात इतकी नवी पुस्तके येत असतात, की पुस्तक पेठेत आल्यावर नेमके कोणते पुस्तक घ्यावे तेच उमजत नाही. म्हणूनच आम्ही अधून मधून काही खास नव्या पुस्तकांची शिफारस करून माहिती देत असतो – 'हे वाचलं का?' या सदरात. तर याच सदरात आज नव्याने आलेल्या **दहा उत्तम पुस्तकांची माहिती देत आहोत.**
जरूर खरेदी करून वाचा ही पुस्तके !

### 1. पुस्तकाचे नाव : निढळ -ग्रामविकासाचा दळवी पॅटर्न

**लेखक : सुनील चव्हाण / प्रस्तावना : नाना पाटेकर**


**किंमत : 499/-** **विशेष सवलत : 420/-**




सातारा जिल्ह्यातलं, दुष्काळी माणदेशातलं हे गाव कसं होतं आणि आता कसं झालं आहे, ही पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना. वाचत गेलो तसं वाटायला लागलं की हे शक्य नाही. एखाद्या गावाचा इतका आमूलाग्र बदल होऊ शकतो का? मी त्यामागचा पट बघितला. चाळीस वर्षांचा हा विस्तीर्ण पट आहे. चंद्रकांत दळवी हा गावातला मुलगा १९८३ मध्ये उपजिल्हाधिकारी म्हणून शासकीय सेवेत जातो, 'आयएएस' बनतो आणि सुमारे ३५ वर्षांच्या नोकरीमध्ये सतत आपल्या गावाचा विचार करत राहतो. माणदेशातल्या या दुष्काळी गावाचं रूप पालटायचं याची खूणगाठ मनात बांधतो. मग सतत विचार, ध्यास, दृढनिश्चय आणि मग कृती! या प्रवासात लाखमोलाची माणसं येऊन मिळाली. कार्यकर्त्यांची फौज त्यानं उभी केली. श्रमदान, ग्रामस्वच्छता, कुऱ्हाडबंदी, चराईबंदी, दारूबंदी अशा नवनवीन योजना आखून त्या फौजेचा सक्रिय सहभाग कायम जिवंत ठेवला. बाहेरून पैसे आणून गावात भौतिक कामं उभी करणं कुठल्याही 'आयएएस' अधिकाऱ्याला शक्य होतं; पण चंद्रकांतला लोकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा वाटला. गावाच्या विकासासाठी लोकांना एकत्र आणण्याचं शिवधनुष्य त्यानं उचललं. चंद्रकांत आणि त्यांच्यासोबत उभ्या राहाणाऱ्या समस्त निढळकरांना माझा नमस्कार !

## 2. पुस्तकाचे नाव : आरण्यक

**लेखक:विभूतिभूषण बंद्योपाध्याय /अनुवाद:शंकर बाळाजी शास्त्री**




**किंमत : 285/-** **विशेष सवलत : 225/-**

सुप्रसिद्ध बंगाली लेखक विभूतिभूषण बंद्योपाध्याय यांची आरण्यक ही आणखी एक महत्त्वाची कादंबरी. ही कादंबरी म्हणजे अनेक आघाती कारणांनी दृष्टिआड होत चाललेल्या वन्य जीवनाचे जीवंत चित्र आहे. बंद्योपाध्याय यांच्या लेखनात अस्सल भारतीय जीवनाचे अतिशय सूक्ष्म निरीक्षण आणि तरल संवेदनशीलतेने केलेले व्यक्तिचित्रण यांचा साक्षात प्रत्यय ह्याही कादंबरीत आपल्याला येतो. या कादंबरीचा घटनाक्रम घडतो, तो छोटा नागपूर सारख्या निसर्गरम्य परिसरात. त्यामुळे स्वाभाविकच मानवी जीवनाच्या या अनोख्या चित्रणात निसर्ग देखील एक घटक बनून आपल्याशी नव्याने जोडला जातो. लेखकाची समकालीन वास्तवाचे सजग भान, तरल संवेदनशीलता, तीव्र कल्पनाशक्ती अशी कितीतरी वैशिष्ट्ये आरण्यक मधून आपल्याला सशक्ततेनं दृग्गोच्चर होतात.

## 3. पुस्तकाचे नाव : वृक्षगान


**लेखक: शरादिनी डहाणूकर**




**किंमत : 200/-** **विशेष सवलत : 150/-**

झाडांची आणि माझी दोस्ती तशी खूप जुनी ! हा वारसा मिळाला आईवडिलांकडून. दोघांचीही वृक्षवल्ली सोयरी ! निसर्गसंपन्न गोव्यानं नुसती बघायची नजरच नाही दिली, त्या नजरेत जिव्हाळ्याचं पाणी दिलं ! जिथे साधा कौलांवर चढणारा भोपळ्याचा वेल, दुधीण होऊन, शेजारणीसारखा गप्पा मारायला येतो, जिथे दारच्या केळीच्या प्रसूतीची हकिकत, कौतुकाने रोजीबाईला ऐकवली जाते, आणि शहाळ्यांना बाजारात किंमत असूनही, झाडाची बाळफळे तोडताना जीव कचरतो, अशा गोव्याने दिलेली देणगी त्यांना! बाबांच्या हातांना तर मायेचे पाझर. दगड देखील त्यांनी लावला तर अंकुरेल. आईने जिथे जाईल तिथून आसासून फांद्या आणायच्या आणि बाबांनी त्या जोपासायच्या. हा वसा मी घेतला आहे आता! वारसा काय फक्त स्थावर जंगम इस्टेटीचा असतो ? वृक्षस्नेहाचं बीज कधी रोपलं गेलं आठवत देखील नाही, पण लहानपणापासूनची झाडांची सोबत मनात घट्ट बाद रुजवून आहे. सुट्टीत गोव्याला गेल्यावर झाडांच्या सहवासात खेळताना, घरामागच्या डोंगरावर हुंदडताना माझ्या आनंदाला उधाण यायचं. मुंबईच्या 'बंद दाराच्या' संस्कृतीमधील, माझं एकटेपण या झाडांनीच गोंजारलं. माझा शाळा शाळा खेळ गॅलरीतल्या फुलझाडासंगे चालायचा. दिसामासी ही मैत्री अशी फुलारत गेली, बघता बघता रोपट्याचा वृक्ष व्हावा तशीच !

## 4. पुस्तकाचे नाव : सोस्यूर ते चॉम्स्की




**भाषांतर : मिलिंद मालशे**


**किंमत : 400/-** **विशेष सवलत : 300/-**

फेर्दिनां द सोस्यूर या फ्रेंचभाषक स्विस प्राध्यापकाने जिनिव्हा येथे दिलेल्या व्याख्यानांचे, त्याच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या टिपणांचे पुस्तक, त्याच्या मृत्यूनंतर १९१६ साली फ्रेंचमध्ये प्रसिद्ध झाले. आधुनिक भाषाविज्ञानाची गंगोत्री असे त्या पुस्तकाचे वर्णन करता येईल. त्यापूर्वीचा भाषाभ्यास शब्दांची व्युत्पत्ती, व्याकरण, भाषेचा इतिहास, भाषांची तुलना, ध्वनी अशा विविध ज्ञानशाखांद्वारे होत होता; पण सोस्यूरच्या पुस्तकानंतर एककालिक भाषाभ्यास म्हणजे भाषाविज्ञान खऱ्या अर्थाने विकसित होऊ लागले. सोस्यूरच्या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर १९५९ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत सोस्यूरप्रमाणेच एमिनो, याकबसन, हाइम्झ, लबव, ब्राइट, रामानुजन आणि चॉम्स्की या आघाडीच्या विचारवंतांनी मांडलेल्या काही मूलभूत भाषावैज्ञानिक तत्त्वांचा आणि सिद्धांतांचा परिचय या पुस्तकातील लेखांच्या भाषांतरांमधून आणि त्यांची प्रास्ताविके व टिपा यांमधून होईल. ही भाषांतरे डॉ. मिलिंद मालशे यांनी केली आहेत. 'आधुनिक भाषाविज्ञान: सिद्धांत आणि उपयोजन' हे मराठीतील पहिले व उत्तम पाठ्यपुस्तक लिहून डॉ. मालशे यांनी मराठीच्या विद्यार्थ्यांची सोय केलीच आहे. ही भाषांतरे म्हणजे त्या पुस्तकाला पुरवणीच आहे, असे म्हणता येईल. या काटेकोर व परिश्रमपूर्वक केलेल्या भाषांतरामुळे मराठीच्या अभ्यासकांची भाषाविज्ञानाची समज अधिक व्यापक व सखोल होईल, अशी मला खात्री वाटते.

***- प्रा. प्र. ना. परांजपे***

## 5. पुस्तकाचे नाव : माणूस असण्याच्या आठवणी

**(देवी प्रसाद मिश्र यांच्या अन्य कथा)**





**भाषांतर : गणेश विसपुते**

**किंमत : 450/-** **विशेष सवलत : 360/-**

नवीन जोडे विकत घ्यायला गेलेला, आणि किमती ऐकल्यावर हबकून चपलाही विकत न घेता परत फिरणारा माणूस, देहविक्रय करणाऱ्या स्त्रीसोबत तिला थकवणारा देहव्यापार केल्यानंतर, तिच्या पाठीवरच्या डागामुळे पैसे नाकारणारा माणूस, अगतिक, विफल, दयाळू ते कुटिल, हिंस्र, क्रूर अशी माणूसपणाची विविध चिन्हं देवी प्रसाद मिश्र या छोट्या छोट्या कथांतून उभी करतात. मूलतः कवी असलेल्या देवी प्रसादांनी हा लहान कथांचा फॉर्म निवडताना, ज्याला त्यांनी 'अन्य कथा' असं नाव दिलं आहे, आपली कविता हरमू दिलेली नाही. त्यामुळे इथे समुद्राच्या आसपास स्वतःच्या आतला समुद्र घेऊन फिरणारी स्त्री भेटते, ज्याला नेहमी हवा व्हायचं होतं असा वृद्ध भेटतो आणि ऋत्विक घटकची 'सुवर्णरखा' जिथे चालू असेल, अशा ठिकाशी उतरवा असे बस कंडेक्टरला सांगणारा माणूस भेटतो.

पण या साऱ्यातून देवी प्रसाद आपल्या समोर आणू पाहतायत तो. आहे, 'एक भयंकर दुसऱ्या भयंकराची जागा घेतंय' अशा स्वरूपाचा समकाल, परिघावर राहणाऱ्या, हरलेल्या, उपेक्षित, माणसांच्या जगण्याच्या या 'मंत्र पुटपुटाव्या' तशा सांगितलेल्या कथा तुम्हाला भारून टाकतील.
***-जयप्रकाश सावंत***

## 6. पुस्तकाचे नाव : भूमकाल





**भाषांतर : माधव सरकुंडे**

**किंमत : 480/-**          **विशेष सवलत : 360/-**

सरकारी धोरणांमुळे होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आदिवासी समूहांनी पुकारलेलं बंड म्हणजे भूमकाल. बस्तर संस्थानातील आदिवासींनी १९१० मध्ये ब्रिटिश सरकारविरुद्ध असं बंड पुकारलं होतं. ते भूमकाल आंदोलन म्हणून प्रसिद्ध आहे.
अर्थात पारतंत्र्यातून मुक्त झाल्यानंतरही आदिवासींचा हा भूमकाल (संघर्ष) अद्याप संपलेला नाही.नैसर्गिक साधनसंपत्तीवर सरकारचा हक्क या न्यायाने केला जाणारा अन्याय तर आदिवासींना सहन करावा लागतोच आहे, पण त्याचबरोबरीने व्यक्तिगत जीवनातही गरिबी आणि त्यातून येणारी अभावग्रस्तता आणि अशा अभावग्रस्ततेतही शिक्षणाला प्राधान्य देत स्वतःची वेगळी वाट शोधणाऱ्यांनाही समाजव्यवस्थेबरोबर विविध पातळ्यांवर संघर्षरत राहावं लागत आहे.अनेक अडथळ्यांची शर्यत पार करत ज्यांनी चिकाटीने शिक्षण पूर्ण केलं आणि इंग्रजी विषयाचे प्रोफेसर बनले त्या माधव सरकुंडे यांनाही व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात भूमकाल करावा लागला. त्याचीच ही गोष्ट आहे, जी आदिवासींच्या वेगळ्या विश्वात घेऊन जाते आणि समाजाचं वर्तन कसं दुटप्पी असतं याचंही दर्शन घडवते.

## 7. पुस्तकाचे नाव : अबुझमाडचे अनुनाद





**लेखक : नरेंद्र**          **भाषांतर : अवधूत डोंगरे**

**किंमत : 499/-**          **विशेष सवलत : 399/-**

नरेन्द्र यांचा १९८०च्या दरम्यान मध्य भारतातील अबुझमाड या आदिवासी प्रदेशाशी पहिल्यांदा संपर्क आला. एका अभ्यासप्रकल्पाचा भाग म्हणून ते तिथे गेले. पण इथे अभ्यास करणं निरर्थक आहे, त्यापेक्षा नुसते अनुभवच घेत राहिलेलं बरं, असं त्यांच्या मनात आलं. मग २०१३ पर्यंत ते या प्रदेशात सुरुवातीला अगदी आत, आणि नंतर बाहेरच्या बाजूला बस्तरमधील गावात राहिले. अबुझमाड नि बस्तर इथल्या तीस वर्षांच्या अनुभवांचे अनुनाद शब्दांमध्ये नोंदवण्याचा प्रयत्न त्यांनी सदर पुस्तकातून केला आहे.

## 8. पुस्तकाचे नाव : पुण्यश्लोक अहिल्यादेवी आणि मराठेशाही




**लेखक : प्रा. डॉ. मधुकर सलगरे**


**किंमत : 350/-** **विशेष सवलत : 265/-**

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी आणि मराठेशाही" या ग्रंथातून मराठी शारदेच्या दरबारात रुजू झालाय. छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेपासून थेट यशवंतराव होळकरांच्या पराक्रमी पत्नी, महाराणी तुळसाबाई आणि कन्या भीमाबाई यांच्या कर्तृत्वापर्यंतचा, सुमारे २५० वर्षांचा मराठ्यांचा इतिहास सूत्ररूपाने या ग्रंथात मांडला गेला आहे. लेखकाची भूमिका समतोल आणि विवेकनिष्ठ असल्याने त्यांच्या लेखनाला जातधर्माचे रंग डागाळत नाहीत. त्यामुळे वस्तुनिष्ठ मांडणीतून समग्र इतिहास इथे सारांश रूपाने साकारला गेला आहे.

इतिहासाकडे सुटे सुटे न पाहता समग्र दृष्टीने आकलन करण्याची दुर्मिळ पद्धती लेखकाने या त्यांच्या ग्रंथात सिद्ध केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह भारताची राष्ट्रीय एकात्मता संरक्षिली जाईल. इतिहासकालीन एकात्मतेचे भान नव्या बलशाली भारताच्या उभारणीत निर्णायक ठरते. या ग्रंथाचे मूल्य नव्या भारतासाठी उपयुक्त आहे.

***-डॉ. श्रीपाल सबनीस***

## 9. पुस्तकाचे नाव : रजनीकांत




**लेखक : अशोक** **अनुवाद : डॉ.अ.रा.यार्दी**

**किंमत : 250/-** **विशेष सवलत : 188/-**

अशोक (वेणुगोपाल) ही चित्रपट आणि सामाजिक क्षेत्रात फार मोठे नाव असलेली व्यक्ती आहे. १९७५ मध्ये कन्नड चित्रपटक्षेत्रात प्रवेश करून (हेण्णु, संसारद कण्णु) या चित्रपटात त्यांनी पहिली भूमिका केली. यानंतर त्यांनी सनादी अप्पण्णा, भाग्यवंतरु, रंगनायकी, क्रांतियोगी बसवण्णा, तायिय मडिलल्लि, चेल्लिद रक्त, दीप अशा अनेक चित्रपटांतून उत्तम भूमिका साकारल्या आहेत. हिंदी चित्रपटातील अभिनेत्री श्रीदेवी हिनेही त्यांच्याबरोबर अभिनय केला आहे.

अर्धसत्य, दंडपिंडगळ, कथे, आघात, निक्षेप आणि गुप्तगामिनी या दूरदर्शनवरील कन्नड मालिकांमध्येही अभिनय केला आहे. कर्नाटक चित्रपट कामगार-कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे. विविध संघटनांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील संमेलनात भाग घेण्यासाठी फ्रान्स, स्विझरलँड, जर्मनी आणि ऑस्ट्रेलिया या देशांना भेटी दिल्या आहेत.

अशोक (वेणुगोपाल) हे 'रजनीकांत'चे परममित्र म्हणून ओळखले जातात. त्यांनी 'रजनीकांत 'वरील कमालीच्या प्रेमापोटी हे लेखन केले आहे.

## 10. पुस्तकाचे नाव : नरकातला स्वर्ग




**लेखक : संजय राऊत**

**किंमत : 350/-** **विशेष सवलत : 265/-**

मिट्ट काळोखाची अखेर नजरेला सवय होतेच. समाजाला आणि माणसांनाही. म्हणून कोणालाही मिट्ट काळोखाची भीती वाटणं काही कमी होत नाही. ज्या काळोखाची पुढे सवय होते, त्या काळोखाला अगोदरच आव्हान देऊन त्यात उडी मारणारी माणसं फार कमी असतात. मुळात ती माणसं तशीच जन्मत असतात की घडत जातात, हाही एक विवाद्य विषय आहे.संजय राऊत हा असाच एक माणूस. २०१४ साली भारतात फॅसिस्ट काळोखाची छाया पसरू लागली. २०१६ च्या मनमानी नोटबंदीने तो काळोख देशभर पसरवला, अधोरेखित केला. त्यानंतर भाजप संघप्रणीत राजवटीचे स्वमर्जीने स्लीपर सेल बनलेल्या अस्सल भारतीय गेस्टापो एजन्सीज, आयटी, ईडी, सीबीआय, एनएसए आणि एनसीबी यांनी सत्तापक्षाच्या राजकीय विरोधातल्या सर्व व्यक्ती, संस्था आणि राजकीय पक्ष यांना लक्ष्य बनवले. देशभर खोट्या आरोपपत्रांद्वारे विरोधातल्या व्यक्ती, शक्ती, उद्योगपती आणि पक्ष यांच्यावर लाखो पानांची आरोपपत्रं लिहिली गेली. शेकडो निरपराध मानवतावादी पत्रकार, राजकीय नेते, उद्योजक आणि मोदीविरोधक तुरुंगात डांबले गेले. आजही डांबले जात आहेत.

त्यामधला एक सर्वात डोळस पत्रकार आणि खासदार म्हणजे संजय राऊत. अनेक आमिषं, अनेक धमक्या आणि गद्दारीचे अनेक मोह टाळून त्याने ईडीच्या तुरुंगात उडी घेतली. आपण निरपराध असताना हा तुरुंगाचा काळोख त्याने स्वीकारला. त्या काळोखात हळूहळू त्याला सभोवतालचा तुरुंग आणि त्या तुरुंगाबाहेरचा तुरुंग बनलेला देश दिसू लागला. त्याचंच हे मर्मभेदक चित्रण - 'नरकातला स्वर्ग.'भारताच्या इतिहासातल्या एका भयाण काळ्याकुट्ट कालखंडात आपण जगत असताना एका पत्रकार-लेखक-संपादकाने तुरुंगातून आपल्या भोवतालच्या समाजाला मारलेली ही हाक प्रत्येक वाचकाने वाचलीच पाहिजे.

त्यामुळे कदाचित त्यालाही हा काळोख दिसू लागेल...

***-राजू परूळेकर***


### राजहंस पुस्तक पेठ

**पत्ता : साई सरस्वती, शिक्षक नगर, गल्ली क्र. ७ च्या सुरवातीस, परमहंस नगर, वनाज जवळ, पौड रोड, पुणे ४११०३८**

**संपर्क : ९३२२६३०७०३**

**rajhanspustakpeth @gmail.com**

**वेळ : स. १०.३० ते रा. ८.००**